आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

६ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- बांगलादेशातल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर तिथं अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी मुख्यमंत्री प्रयत्नशील
- बांगलादेशातल्या भारतीय नागरिकांशी सातत्यानं संपर्कात असल्याची केंद्र सरकारतर्फे संसदेत ग्वाही
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना ‘द कंपॅनियन ऑर्डर ऑफ फिजी’ हा फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान
- शेअर बाजारात घसरण सुरुच

  **आणि**
- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्राचा अंतिम फेरीत प्रवेश/ विनेश फोगाटचं स्पर्धेतलं आव्हान कायम

**<><><><><>**

बांगलादेशातल्या अशांततेच्या पार्श्वभूमीवर तिथे अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी परराष्ट्र मंत्रालयाशी संपर्क साधला आहे.  बांगलादेशातल्या परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेता, परराष्ट्र मंत्रालयानं तिथे अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांना सर्व प्रकारची मदत करावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

यासाठी बांगलादेशात असलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांची यादी परराष्ट्र मंत्रालयाकडे सोपवण्यात आली असून, तिथल्या परिस्थितीवर लक्ष ठेवण्यासाठी, तसंच केंद्रीय अधिकारी आणि विद्यार्थ्यांच्या कुटुंबांमध्ये समन्वय साधण्यासाठी राज्य शासनानं एक पथक स्थापन केलं आहे. विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी बांगलादेशातल्या भारतीय दूतावासाशी समन्वय साधला जात आहे.

बांगलादेशात अडकलेल्या राज्यातल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असून, या आव्हानात्मक काळात राज्य सरकार विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांबरोबर असल्याचं मुख्यमंत्री शिंदे यांनी म्हटलं आहे.

<><><><>

बांगलादेशात निर्माण झालेलं अस्थिर आणि अशांत वातावरणाच्या पार्श्वभूमीवर तिथं असलेल्या भारतीय नागरिकांशी केंद्र सरकार राजनैतिक उपक्रमांच्या माध्यमातून सातत्यानं संपर्कात असल्याची माहिती परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी लोकसभा आणि राज्यसभेत दिली. बांगलादेशात निर्माण झालेल्या परिस्थितीबाबत जयशंकर यांनी दोन्ही सभागृहात आज निवेदन दिलं. सध्या बांगलादेशात १९ हजार भारतीय नागरिक असून त्यात नऊ हजार विद्यार्थी असल्याचंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान, शेख हसीना यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर भारतात येण्यासाठी परवानगी मागितली होती. काल संध्याकाळी त्या दिल्लीत दाखल झाल्याचं जयशंकर यांनी सांगितलं.

<><><><>

बांगलादेशातल्या आंदोलकांनी हंगामी सरकार स्थापनेच्या हालचाली सुरू केल्या आहेत. आंदोलकांनी नोबेल पुरस्कार विजेते डॉक्टर मोहम्मद युनूस यांची हंगामी सरकारच्या मुख्य सल्लागारपदी नियुक्ती केल्याची माहिती आंदोलन समितीचे समन्वयक नाहिद इस्लाम यांनी समाज माध्यमावर शेअर केलेल्या व्हिडिओमधून दिली. प्रधानमंत्री शेख हसीना यांनी राजीनामा दिल्यानंतर राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी हंगामी सरकार स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला.

<><><><>

बांगलादेशाच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर तिथल्या लष्कर आणि राजकीय नेत्यांनी देशात शांततापूर्ण लोकशाही प्रस्थापित

करण्यासाठी एकत्र येऊन काम करावं, असं संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी म्हटलं आहे. बांगलादेशाच्या नागरिकांचे लोकशाही आणि मानवी हक्क अबाधित राहावेत, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना आज फिजीचा 'द कंपॅनियन ऑर्डर ऑफ फिजी' हा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. फिजीचे राष्ट्रपती विलयम काटोनिवेरे यांनी त्यांना या पुरस्कारानं सन्मानित केलं. फिजीच्या लष्करानं त्यांना मानवंदनाही दिली. मुर्मू यांनी भारत-फीजी संबध दृढ करण्यासंदर्भात फिजीचे राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांबरोबर चर्चा केली. फिजीची राजधानी सुवा इथं आज सकाळी त्यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं. फिजीत गेल्या वर्षी फेब्रुवारीमध्ये भारताच्या सहकार्यानं सुरू करण्यात आलेल्या सौर प्रकल्पाची राष्ट्रपतींनी पाहणी केली.

फिजीच्या दौऱ्यानंतर राष्ट्रपती मुर्मू ७ ते ९ ऑगस्ट दरम्यान न्यूझीलंडला जाणार आहेत. तर १० ऑगस्टला त्या तिमोर लेस्टे देशाला भेट देणार आहेत.

फिजीचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळाल्याबद्दल प्रधानमंत्र्यांनी राष्ट्रपतींचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

केरळच्या वायनाड जिल्ह्यात मुसळधार पावसामुळं दरड कोसळून झालेल्या दुर्घटनेत जीवित आणि वित्तहानी झाली. या परिस्थितीवर मात करण्यासाठी महाराष्ट्र शासनानं केरळला १० कोटी रुपयांची मदत दिली आहे. तसंच जुलै महिन्यात आसाम राज्यात पूरस्थितीमुळे मोठ्या प्रमाणात हानी झाली. त्यातून सावरण्यासाठी आसामलाही महाराष्ट्र शासनाकडून १० कोटींची मदत जाहीर करण्यात आली आहे.

**<><><><><>**

जपानच्या निक्केई या शेअर बाजारात झालेल्या घसरणीचा थेट परिणाम काल भारतीय शेअर बाजारावर झाला होता. आजही संपूर्ण दिवसभरात शेअर बाजारात घसरण सुरू राहिली.

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज १६६ अंकांची घसरण झाली आणि तो ७८ हजार ५९३ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ६३ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ९९३ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रानं अंतिम फेरीत स्थान मिळवलं आहे. पात्रता फेरीत ब गटातून पहिल्याच प्रयत्नात त्यानं ८९ पूर्णांक ३४ शतांश मीटर इतका लांब भाला फेकला. या हंगामातली नीरजची ही सर्वोत्तम कामगिरी आहे.

महिलांच्या ५० किलो वजनी गटातल्या कुस्ती स्पर्धेत विनेश फोगाटनं उपांत्य फेरीत प्रवेश केल्यानं ऑलिम्पिक पदक मिळवण्याचं तिचं स्वप्न कायम आहे. विनेशनं उपांत्यपूर्व फेरीत युक्रेनच्या ओकसाना लिवाच हिला पराभूत करत उपांत्य फेरीत प्रवेश केला. तत्पूर्वी उपउपांत्यपूर्व फेरीत विनेशनं जपानच्या युई सुसाकी हिला ३-२ असं पराभूत केलं. आज रात्री साडेदहा वाजता उपांत्य फेरीत विनेशची लढत क्युबाच्या युसनेलिस गुझमान लोपेझ हिच्याशी होणार आहे.

हॉकीमध्ये आज भारताचा उपांत्य फेरीत जर्मनीशी लढत होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार हा सामना रात्री १० वाजून ३० मिनिटांनी सुरू होईल.

**<><><><><>**

मुंबईतल्या खासगी महाविद्यालयातला हिजाब आणि बुरखा बंदीचा नियम कायम ठेवणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घ्यायला सर्वोच्च न्यायालयानं आज मंजुरी दिली. मुंबईतल्या चेंबूर एज्युकेशन सोसायटीच्या एनजी आचार्य आणि डीके मराठे महाविद्यालयाच्या परिसरात हिजाब आणि बुरख्यावर बंदी घालण्याचा महाविद्यालय प्रशासनाचा निर्णय २६ जून रोजी मुंबई उच्च न्यायालयानं कायम ठेवला होता. या निर्णयाविरोधात मुस्लिम समाजाच्या विद्यार्थ्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

**<><><><><>**

नाशिक शहराला पाणीपुरवठा करणारं गंगापूर धरण ८७ टक्के भरलं आहे. गंगापूर धरणातला पाणीसाठा गेल्या वर्षीच्या या वेळेपेक्षा दोन टक्के जास्त असला तरी जिल्ह्यातल्या २४ जलाशयात मिळून ६१ पूर्णांक ६२ शतांश टक्के साठा शिल्लक आहे.

पावसाचा जोर कमी झाल्यामुळं जलसंपदा विभागानं पाण्याचा विसर्ग कमी केला असून सध्या गंगापूरमधून ४७० तर दारणा धरणातून ५ हजार ३५६ आणि नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून १५ हजार २७४ क्युसेक विसर्ग सुरू आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.